

वनगळी (ता. इंदापूर) येथील पाटील अभियांत्रिकीमध्ये निर्भय कन्या अभियान पार पडल

# पाटील अभियांत्रिकीत निर्भय कन्या अभियान

**बावडा :** वनगळी इंदापूर येथील एस. बी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील महिला दक्षता समिती व विद्यार्थी विकास मंडळातर्फे निर्भय कन्या अभियान शुक्रवारी (दि.२८) आयोजित करण्यात आले होते. या वेळी एस. बी. अकॅडमीचे प्रमुख सागर बनसुडे व सहकाऱ्यांनी सेल्फ डिफेन्स अँड मार्शल आर्ट ट्रेनिंग प्रोग्राम या अंतर्गत प्रात्यक्षिके सादर केली. परिवर्तन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ओंकार साळुंखे यांनीही मुलींना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी एस. बी. देवकर, प्राचार्य डॉ. एस. टी. शिरकांडे, प्रा. व्ही. एस. नलावडे, विभागप्रमुख उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिला दक्षता समिती प्रमुख प्रा. एम. व्ही. गायकवाड, विद्यार्थी विकास प्रमुख प्रा. पी. एस. तोग्रीकर, कार्यक्रम प्रमुख प्रा. पी. एस. ताकवले, प्रा. पी. यू. चव्हाण आदींनी परिश्रम घेतले. या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, सचिव भाग्यश्री पाटील, उपाध्यक्षा अंकिता पाटील ठाकरे, विश्वस्त राजवर्धन पाटील यांनी कौतुक केले.